# इ. 11 वी केंद्रीय प्रवेश समिती पुणे 2014-15

## प्रसिद्धी निवेदन  दिनांक १८/६/२०१४

पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील इयत्ता ११ वी चे प्रवेश सन १९९६-९७ पासून केंद्रिय प्रवेश पद्धतीने केले जात आहे. सदरची प्रवेश प्रक्रिया महाराष्ट्र राज्यामध्ये पुणे शहरात पहिल्यांदाच सुरु करण्यात आली होती. केंद्रिय प्रवेश पध्दतीने प्रवेश देण्याचे हे एकोणीसावे वर्ष आहे. सन २०१४-१५ शैक्षणिक वर्षापासून इयत्ता ११ वी चे प्रवेश ऑनलाईन केंद्रीय पद्धतीने करण्यात येत आहे.

सन २०१४-१५ या वर्षी पासून इ. ११ वी चे प्रवेश ऑनलाईन पध्दतीने केले जात आहेत. इ. ११ वी प्रवेश ऑनलाईन प्रवेश पध्दतीने करण्यामुळे विदयार्थ्यांना अर्ज घेण्यासाठी व अर्ज सादर करण्यासाठी स्वीकृती केंद्रावर जावे लागले नाही त्याऐवजी त्यांना प्रवेश अर्ज स्वत:च्या घरी किंवा शाळेमध्ये बसून ऑनलाईन पध्दतीने करता आला त्यामुळे इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश घेऊ इच्छिणा-या सर्व विदयार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे श्रम, पैसा व वेळ वाचला हे नक्कीच.

प्रवेश प्रक्रियेसाठी एकूण नऊ झोन तयार करण्यात आले आहेत. प्रत्येक झोन मध्ये झोन प्रमूख, झोन सहाय्यक व एक पर्यवेक्षीय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली असून सदर नऊ झोन मधील एकूण २४ मार्गदर्शन केंद्रावर ४८ संपर्क प्रमूख कार्यरत आहेत.

इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेद्वारा कला, विज्ञान, वाणिज्य या शाखेत प्रवेश दिले जाणार आहेत.

खालील प्रवेश ऑनलाईन पद्धतीने न होता संबंधित कनिष्ठ महाविद्यालय स्तरावरुन केले जातील.

अ) किमान कौशल्यावर आधारीत व्यवसायिक अभ्यासक्रम (HSC-VOCATIONAL(MCVC)) ब) गृहविज्ञान (Home Science) क) व्यवस्थापन, अल्पसंख्यांक व इनहाऊस कोटयाचे प्रवेश ड) तांत्रिक कनिष्ठ महाविद्यालयातील प्रवेश. इ) रात्र कनिष्ठ महाविद्यालयातील प्रवेश. फ) हिंदी व उर्दू माध्यमाचे उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील प्रवेश.

## प्रवेश संदर्भात महत्वाच्या सूचना :-

१. प्रवेश अर्जातील पार्ट-१ व पार्ट-२ भरून झाल्यानंतर **Submit / Confirm** बटन प्रेस केल्यानंतरच आपला ऑनलाईन फॉर्म भरण्याची प्रक्रिया पुर्ण होईल याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

२. एकूण प्रवेश टप्प्यानुसार तीन गुणवत्ता याद्या जाहीर करण्यात येणार आहे. या गुणवत्ता याद्या तयार करताना विद्यार्थ्यांची गुणवत्ता व आरक्षण तसेच विद्यार्थ्यांनी उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाचा निवडलेला पसंतीक्रम त्या संबंधित कॉलेजच्या कटऑफसह विचारात घेण्यात येईल.

३. विद्यार्थ्यांच्या पसंतीक्रमानुसार व गुणवत्तेनुसार मिळालेल्या कनिष्ठ महाविद्यालयातील प्रवेश विहित कालावधीत घेणे अत्यावश्यक आहे. सदर प्रवेश न घेतल्यास त्याचे/तिचे नांव प्रवेश प्रक्रियेमधून आपोआप वगळले जाईल व सदर विद्यार्थी प्रवेश प्रक्रियेतून पूर्णत: बाहेर जाईल याची पालक, विद्यार्थी यांनी नोंद घ्यावी.

४. ज्या विद्यार्थ्यांनी दोन शाखांसाठी अर्ज केला असेल तर प्राधान्यक्रम देताना दोन्ही गटांमध्ये प्रत्येक शाखेसाठी किमान १ पसंतीक्रम देणे आवयक आहे. कोणत्याही शाखेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना संपूर्ण प्रवेश प्रक्रियेदरम्यान बेटरमेंटची (उन्नत प्रवेशाची) एकच संधी उपलब्ध राहील. ही संधी विद्यार्थ्यांने त्यांच्या प्रवेश अर्जात नमूद केलेल्या पसंतीक्रमाच्या चढत्या क्रमानुसार असेल.

५. फॉर्ममध्ये पसंतीक्रम सोडून इतर बाबतीत काही दुरूस्ती करावयाची असल्यास विद्यार्थ्यांनी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांकडून / मार्गदर्शन केंद्रावरून करावी.

६. प्रत्येक झोनप्रमुख व झोनमधील मार्गदर्शन केंद्रे विद्यार्थ्यांना त्यांच्या तक्रारी व शंकांबाबत मार्गदर्शन करतील.

७. तिसऱ्या फेरीचे प्रवेश झाल्यानंतर संबंधित उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयात उपलब्ध असलेल्या वैकल्पिक भाषा, विषय व द्विलक्षी अभ्यासक्रमातील विषयांचे (बायफोकल) प्रवेश विद्यार्थ्यांची मागणी व गुणवत्तेनुसार संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाच्या स्तरावरून केले जातील.

| अ.क्र. / नांव | शाखा/माध्यमनिहाय कॉलेज संख्या व प्रवेश क्षमता | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शाखा | कला | | | वाणिज्य | | | विज्ञान | | | एकूण |
| माध्यम | मराठी | इंग्रजी | एकूण | मराठी | इंग्रजी | एकूण | मराठी | इंग्रजी | एकूण | |
| कॉलेज संख्या | 70 | 32 | 102 | 104 | 110 | 214 | 1 | 178 | 179 | 205/495 |
| विद्यार्थी संख्या | 7700 | 3140 | 10840 | 12060 | 16655 | 28715 | 80 | 28030 | 28110 | 67665 |

# प्रवेश अर्ज भरताना व प्रवेश घेतेवेळी घ्यावयाची दक्षता.

## टप्पा - १ (प्रवेश अर्ज)

- आपल्या शाळेतून माहितीपुस्तिका खरेदी करा व शाळेतील शिक्षकांकडून प्रवेश प्रक्रिया समजून घ्या.
- नमुना अर्ज भरण्यापूर्वी माहितीपुस्तिका काळजीपूर्वक वाचा.
- माहितीपुस्तीकेमध्ये लॉगिन आयडी आणि पासवर्ड शोधा
- **http://pune.fyjc.org.in/**या वेबसाईट वर जा
- पहिल्यांदा लॉगिन करण्यासाठी माहितीपुस्तीकेमध्ये दिलेला लॉगिन आयडी आणि पासवर्ड वापरा
- पासवर्ड बदला आणि पुढच्या वेळेस लॉगिन करण्यासाठी लक्षात ठेवा
- सिक्युरिटी प्रश्न निवडून तसेच त्याची योग्य उत्तेर लक्षात ठेवा
- सिक्युरिटी प्रश्न व पासवर्ड याची प्रिंट घ्या
- संगणकावर दिलेल्या सूचना पाळून टप्प्याटप्प्याने ऑनलाईन अर्ज भरा
- 'कन्फर्म'या बटनावर क्लिक करुन आपला अर्ज निश्चित करा
- ज्या अर्जदारांच्या माहितीमध्ये काही त्रृटी असतील अथवा काही दुरुस्ती करावयाची असेल त्यांनी आपला अर्ज आणि सादर करावयाची कागदपत्रे आपल्या शाळेकडून मान्यताप्राप्त करुन घ्या.
- खुल्या संवर्गाव्यतिरिक्त महाराष्ट्रातील वैधानिक आणि / अथवा विशेष आरक्षणांतर्गत अर्ज करणारे अर्जदारांनी आपला अर्ज आणि सादर करावयाची कागदपत्रे आपल्या शाळेकडून मान्यताप्राप्त करुन घ्या.

## टप्पा - २ (पसंतीक्रम अर्ज)

- पसंतीक्रम निश्चित करताना शाळा / कॉलेजचे गेल्यावर्षीचे कट ऑफ, आपणास मिळालेले गुण, शाखा, अनुदानित/विनाअनुदानित, माध्यम, शिकविले जाणारे वैकल्पिक विषय याचा साकल्याने विचार करा.
- प्रवेश घ्यावयाच्या उच्च माध्यमिक शाळा /कनिष्ठ महाविद्यालयाच्या पसंती क्रम (कॉलेज कोड नीट तपासणे) निश्चित करा.
- निश्चित केलेल्या पसंती क्रमाचा प्राधान्य क्रम ठरवून कॉलेज कोड अर्जात भरा.
- कॉलेज कोड भरताना चुका करु नका.
- पार्ट-२ फॉर्म भरून झाल्यानंतर **Submit / Confirm** बटन प्रेस करणे अत्यंत आवश्यक आहे. तेव्हाच फॉर्म ऑनलाईन पूर्ण झाला असे म्हणता येईल.

## टप्पा - ३ (प्रवेश प्रक्रिया)

- निकाल जाहीर झाल्यावर पहिली गुणवत्ता यादी जाहीर.
- ज्या महाविद्यालयासाठी आपले नाव गुणवत्ता यादीत आले असेल, त्या महाविद्यालयात आपला प्रवेश निश्चित करा. (केवळ फक्त रु. ५०/- फी भरुन)
- पहिल्यांदा प्रवेश निश्चित केल्यानंतर आपल्याला पुढील फेरीतील गुणवत्ता यादीमध्ये एक बेटरमेंटची संधी उपलब्ध होते आहे का हे तपासण्यात येईल.
- जर आपले नाव कुठल्याच महाविद्यालयासाठी पहिल्या गुणवत्ता यादीत आले नसेल तर पुढच्या गुणवत्ता यादीची वाट पाहा.
- जर एखाद्या महाविद्यालयासाठी आपले नाव गुणवत्ता यादीत आले असेल आणि तरीसुद्धा आपण त्या महाविद्यालयात आपला प्रवेश निश्चित केला नाही तर आपण ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेच्या बाहेर जाल.
- क्रमशः दुसरी व तिसरी गुणवत्ता यादी जाहीर.
- पुढील बेटरमेंट फे-यांमध्ये आपल्याला आपल्या पसंतीक्रमानुसार वरचे महाविद्यालय उपलब्ध झाल्यास आधी प्रवेश घेतलेल्या महाविद्यालयामधून आपला प्रवेश रद्द करा आणि नवीन महाविद्यालयात आपला प्रवेश निश्चित करा.

# इयत्ता ११ वी ऑनलाईन केंद्रिय प्रवेश प्रक्रिया पुणे २०१४-१५

## वेळापत्रक

| दिनांक | तपशील |
|---|---|
| १७ जून २०१४ | इयत्ता १० वी चा निकाल ऑनलाईन प्रसिध्द |
| १९ जून २०१४ ते २३ जून २०१४ (रविवार सह) सायंकाळी ०५ .०० वाजेपर्यंत | उच्च माध्यमिक विद्यालय/ कनिष्ठ महाविद्यालय स्तरावरील *इनहाऊस कोटा, अल्पसंख्यांक कोटा, व्यवस्थापन कोटा प्रवेश प्रक्रिया करणे व भरलेल्या जागा ऑनलाईन पध्दतीने संगणकीय एजन्सीला कळविणे. |
| १९ जून २०१४ ते २३ जून २०१४ सायंकाळी ०५ .०० वाजेपर्यंत | ऑनलाईन प्रवेश अर्ज भरणे (पार्ट-१ अपूर्ण राहिलेला भाग पूर्ण भरणे व भरलेला नसल्यास पार्ट-१ सह पार्ट-२ भरणे). तसेच यापूर्वी भरलेल्या ऑनलाईन प्रवेश अर्जातील आवश्यकतेनुसार विद्यार्थ्यामार्फत ऑनलाईन दुरूस्ती. |
| २८ जून २०१४ सायंकाळी ०५ .०० वाजता | पहिली गुणवत्ता यादी जाहीर करणे. |
| ३० जून २०१४ व १, २ जुलै २०१४ सकाळी १० ते सायं.४ | प्रथम गुणवत्ता यादीनुसार विद्यार्थ्यांना प्रवेश देणे. |
| २ जुलै २०१४ सायंकाळी ०५ .३० वाजेपर्यंत | उच्च माध्यमिक विद्यालय/ कनिष्ठ महाविद्यालय स्तरावरील इनहाऊस कोटा, अल्पसंख्यांक कोटा, व्यवस्थापन कोटयातील रिक्त जागा गुणवत्ता यादी-२ साठी ऑनलाईन पध्दतीने संगणकीय एजन्सीला कळविणे. |
| ५ जुलै २०१४ सायं. ५ वाजता | दुसरी गुणवत्ता यादी जाहीर करणे. |
| ७ व ८ जुलै २०१४ सकाळी १० ते सायं.४ | दुसऱ्या गुणवत्ता यादीनुसार विद्यार्थ्यांना प्रवेश देणे. |
| ८ जुलै २०१४ सायंकाळी ०५ .३० वाजेपर्यंत | उच्च माध्यमिक विद्यालय/ कनिष्ठ महाविद्यालय स्तरावरील इनहाऊस कोटा, अल्पसंख्यांक कोटा, व्यवस्थापन कोटयातील रिक्त जागा गुणवत्ता यादी-३ साठी ऑनलाईन पध्दतीने संगणकीय एजन्सीला कळविणे. |
| ११ जुलै २०१४ सायं. ५ वाजता | तिसरी गुणवत्ता यादी जाहीर करणे. |
| १२ व १४ जुलै २०१४ सकाळी १० ते सायं. ४ | तिसऱ्या गुणवत्ता यादीनुसार विद्यार्थ्यांना प्रवेश देणे. |
| १५ जुलै २०१४ | इयत्ता ११वी साठीचे प्रत्यक्ष अध्यापनाचे काम सुरू करणे. |

* ज्या उच्च माध्यमिक विद्यालय / कनिष्ठ महाविद्यालयांना व्यवस्थापन कोटा / अल्पसंख्यांक कोटयातील जागा केंद्रिय प्रवेश समितीला प्रत्यार्पित **(Surrender)** करावयाच्या आहेत, अशी कनिष्ठ महाविद्यालये ऑनलाईन पध्दतीने जागा प्रत्यार्पित **(Surrender)** करू शकतील.

(डॉ. श्रीकांत गुप्ता)
कार्याध्यक्ष
इ.११वी केंद्रिय प्रवेश समिती
तथा
प्राचार्य
आबासाहेब गरवारे महाविद्यालय

(बाळासाहेब ओव्हाळ)
सचिव
इ.११वी केंद्रिय प्रवेश समिती
तथा
सहाय्यक शिक्षण संचालक
पुणे विभाग, पुणे

(सुमन शिंदे)
अध्यक्ष
इ.११वी केंद्रिय प्रवेश समिती
तथा
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे